# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 03 April 2024

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – ०३ एप्रिल २०२४ सायंकाळी ६.१०**

****

- लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत उद्या संपणार
- शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आणखी चार उमेदवार जाहीर
- नांदेड जिल्ह्यातल्या दोन लाखाहून अधिक महिलांची शंभर टक्के मतदान करण्याची शपथ

आणि

- छत्रपती संभाजीनगर शहरात छावणी परिसरातल्या एका कापड दुकानाला लागलेल्या भीषण आगीत एकाच कुटुंबातल्या सात जणांचा होरपळून मृत्यू

****

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत उद्या संपत असून, सर्वच राजकीय पक्षांचे उमेदवार शक्तिप्रदर्शन करत आपले अर्ज दाखल करत आहेत.

केरळ मधल्या वायनाड लोकसभा मतदारसंघासाठी आज काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. तत्पूर्वी त्यांनी कलपेट्टा इथं एका रोड शोचं नेतृत्व केलं. पक्षाच्या सरचिटणीस प्रियांका गांधी, के सी वेणुगोपाळ आणि इतर नेते यावेळी उपस्थित होते.

****

नांदेड लोकसभा मतदारसंघात आज नऊ अर्ज दाखल झाले असून, आतापर्यंत १९ उमेदवारांचे २० अर्ज दाखल झाल्याची माहिती जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी दिली. काँग्रेसचे उमेदवार वसंतराव चव्हाण

यांनी आज शक्तीप्रदर्शन करत उमेदवारी अर्ज भरला. यावेळी माजी मंत्री अमित देशमुख उपस्थित होते.

परभणी लोकसभा मतदारसंघात आज १८ उमेदवारांनी ३० अर्ज दाखल केले. यामध्ये स्वाभिमानी पक्षाचे किशोर ढगे यांचा समावेश आहे.

अकोला लोकसभा मतदारसंघात भाजपचे महायुतीचे उमेदवार अनुप धोत्रे यांनी आज उमेदवारी अर्ज भरला. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह महायुतीच्या घटकपक्षातले नेते यावेळी उपस्थित होते. पक्ष कार्यालयापासून जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत रॅली काढत धोत्रे यांनी शक्तिप्रदर्शन करुन हा अर्ज दाखल केला.

वर्धा इथं भाजपचे उमेदवार रामदास तडस यांनी फडणवीस यांच्या उपस्थितीत उमेदवारी अर्ज दाखल केला.

अमरावती इथं प्रहार पक्षाचे उमेदवार दिनेश बुब यांनी पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू यांच्या उपस्थितीत उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यानंतर त्यांनी जाहीर सभेला संबोधित केलं.

यवतमाळ लोकसभा मतदारसंघात आज शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे संजय देशमुख यांच्यासह चार उमेदवारांनी अर्ज दाखल केले. या मतदारसंघात आतापर्यंत आठ अर्ज दाखल झाले आहेत.

बुलडाणा लोकसभा मतदारसंघात आज सहा उमेदवारांनी नामांकन अर्ज दाखल केले.

****

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं आज चार उमेदवारांच्या नावांची घोषणा केली. कल्याण लोकसभा मतदारसंघातून वैशाली दरेकर, पालघर – भारती कामडी, जळगाव – करण पवार आणि हातकणंगले मतदारसंघातून सत्यजित पाटील यांना उमेदवारी देण्यात आली आहे. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी मुंबईत पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. महाविकास आघाडीतल्या जागावाटपानुसार आम्ही उमेदवारांची नावं जाहीर केली आहेत, मुंबईत उत्तर मुंबई आणि उत्तर मध्य मुंबई लोकसभा मतदारसंघात मित्रपक्ष काँग्रेसने निवडणूक लढवावी अशी आमची इच्छा असल्याचं ठाकरे यावेळी म्हणाले.

****

दरम्यान, जळगावचे भारतीय जनता पक्षाचे खासदार उन्मेष पाटील यांनी आज शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केला. मुंबईमध्ये पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी खासदार पाटील यांच्या हातात शिवबंधन बांधून त्यांचं पक्षात स्वागत केलं.

****

बळीराजा पक्षानेही आज सात उमेदवारांच्या नावांची घोषणा केली. लातूर लोकसभा मतदारसंघातून शंकर तडाखे, तर परभणीतून कैलास पवार यांना उमेदवारी देण्यात आली आहे. रामटेक इथून संविधान लोखंडे, मावळ- संभाजी गुणाट, हातकणंगले - शिवाजीराव माने, तर सांगली इथून आनंदराव नालगे -पाटील यांना उमेदवारी घोषित करण्यात आल्याची माहिती प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब रास्ते यांनी आज सांगली इथं दिली.

****

आगामी लोकसभा निवडणूक शांततापूर्ण वातावरणात आणि कोणत्याही प्रलोभनांना बळी न पडता पार पाडण्याचे निर्देश केंद्रीय निवडणूक आयोगानं सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांना दिले आहेत. आयोगानं आज राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशातल्या कायदा अंमलबजावणी संस्थाची आढावा बैठक घेतली, त्यात हे निर्देश देण्यात आले. कायदा आणि सुव्यवस्था स्थिती, अनुचित प्रकारांना आळा घालणं तसंच आंतरराज्यीय सीमा आणि आंतरराष्ट्रीय सीमांवर देखरेख याबद्दलचा आढावा या बैठकीत घेण्यात आला.

****

राज्यातल्या लोकसभा मतदारसंघातले उमेदवार, निवडणूक लढवण्यामागची त्यांची भूमिका, स्थानिक राजकारण यांचा आढावा घेणारा `लोकनिर्णय महाराष्ट्राचा` हा कार्यक्रम, आकाशवाणीनं सुरू केला आहे. कार्यक्रमाच्या आजच्या भागात आपण चंद्रपूर लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

****

राज्यसभेच्या नवनिर्वाचित उमेदवारांनी आज सदस्यत्वाची शपथ घेतली. उपराष्ट्रपती आणि राज्यसभेचे अध्यक्ष जगदीप धनखड यांनी, केंद्रीय मंत्री डॉ एल मुरुगन यांच्यासह महाराष्ट्रातून चंद्रकांत हांडोरे आणि मेधा कुलकर्णी यांना सदस्यत्वाची

शपथ दिली. माजी पंतप्रधान डॉ मनमोहनसिंह यांच्यासह ५६ राज्यसभा सदस्यांनी या आठवड्यात आपला कार्यकाळ पूर्ण केला.

****

इयत्ता पहिली, दुसरी, सातवी, आठवी, दहावी आणि बारावीची ३३ लाख शालेय पाठ्यपुस्तकं देशभरातल्या पुस्तक विक्रेत्यांकडे पाठवल्याचं राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेनं म्हटलं आहे. अन्य इयत्तांची पुस्तकं या महिन्यात उपलब्ध होतील, त्यामुळे पालक आणि विद्यार्थ्यांनी घाबरण्याचं कारण नाही, असंही परिषदेनं म्हटलं आहे. बाजारात पुस्तकं उपलब्ध नसल्याच्या वृत्तांवर परिषदेनं आज हे स्पष्टीकरण दिलं.

****

नांदेड जिल्ह्यात वडेपूरी इथं आज जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांच्या उपस्थितीत महिला बचत गटांसाठी मतदार शपथ कार्यक्रम घेण्यात आला. लोकशाही बळकटीकरणासाठी महिलांनी मोठ्या प्रमाणात मतदानासाठी पुढे यावं, असं आवाहन त्यांनी यावेळी केलं. या मोहिमेअंतर्गत आज जिल्ह्यातल्या प्रत्येक गावात सुमारे दोन लाखाहून अधिक महिलांनी शंभर टक्के मतदान करण्याची शपथ घेतली.

****

छत्रपती संभाजीनगर शहरात छावणी परिसरातल्या एका कापड दुकानाला भीषण आग लागून एकाच कुटुंबातल्या सात जणांचा मृत्यू झाला. आज पहाटे तीन वाजेच्या सुमारास ही घटना घडली. कपड्याच्या दुकानात चार्जिंगला लावलेल्या इलेक्ट्रिक बाईकच्या चार्जरचा स्फोट झाल्यानं ही आग लागल्याचं अग्नीशमन दलानं सांगितलं. मृतांमध्ये दोन लहान मुलांचा समावेश आहे. दुकानाला आग लागली तेव्हा हे सर्व वरच्या मजल्यावर झोपलेले होते, त्यामुळे त्यांचा गुदमरून मृत्यू झाल्याचं **स्पष्ट झालं आहे**.

****

हिंगोली जिल्ह्यात वसमत तालुक्यातल्या हट्टा जवळील चिखली फाटा इथं कार आणि दुचाकीच्या अपघातात दुचाकीवरील आई आणि मुलाचा जागीच मृत्यू झाला. गयाबाई आणि शिवाजी भालेराव अशी मृतांची नावं असून, आज सकाळच्या सुमारास परभणीकडे जात असताना हा अपघात झाला.

****

धर्माबाद –मनमाड मराठवाडा एक्सप्रेस येत्या सात आणि दहा एप्रिल रोजी धर्माबाद ते नांदेड दरम्यान अंशतः रद्द करण्यात आली आहे. या दिवशी ही गाडी मनमाडला जाण्यासाठी धर्माबाद ऐवजी नांदेड इथून सुटेल. आदिलाबाद ते मुंबई नंदीग्राम एक्सप्रेस ही गाडी एक एप्रिल ते २८ एप्रिल दरम्यान दादरपर्यंतच धावणार आहे. तसंच औरंगाबाद–हैदराबाद एक्स्प्रेस नऊ एप्रिल रोजी औरंगाबाद येथून वेळेवर सुटणार असल्याची माहिती दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड जनसपंर्क कार्यालयानं दिली आहे. नांदेड ते एरोड विशेष गाडीला येत्या ३० जून पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

****

थायलंड मधल्या फुकेत इथं सुरू असलेल्या जागतिक महिला भारोत्तोलन स्पर्धेत भारताच्या इंद्रायणी देवीनं ५९ किलो वजनी गटात आज कांस्य पदक पटकावलं. देवीनं एकूण १९६ किलो वजन उचललं. उत्तर कोरियाच्या कँग ह्यॉन ग्याँगला सुवर्ण आणि वॅलेंशियाच्या कँबी मिहेलाला रौप्य पदक मिळालं. राष्ट्रकूल स्पर्धेत इंद्रायणी देवीनं रौप्य पदक पटकावलं होतं.

****

नाशिक जिल्ह्यात तीव्र पाणी टंचाई जाणवत असून, सात तालुक्यातल्या २०३ गावं आणि ४३६ वाड्यांना २१० टँकरद्वारे पाणी पुरवठा सुरू आहे. तसंच टँकर आणि गावांसाठी जिल्ह्यातल्या ६७ खाजगी विहिरी अधिग्रहीत करण्यात आल्या आहेत.

पालघर जिल्ह्यातही भीषण पाणी टंचाई असून, नागरिकांना भेडसावणाऱ्या पाणी टंचाईच्या तक्रारींचं निवारण करण्यासाठी पालघरच्या जिल्हाधिकारी कार्यालयात एक नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला आहे.

****